


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३८० वा मंगळवार दि ०२ जून २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# भाजपसोबत संघर्ष, दोन्ही शिवसेना एकत्र येण्याच्या हालचाली? एकनाथ शिंदेंनी चित्र स्पष्ट केलं!

**वृत्तसंस्था ठाणे**

राज्यात विधानपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने काही जागांवरून महायुतीत संघर्ष निर्माण झाल्याचं चित्र असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार अब्दुल सत्तार यांनी भाजपविरोधात जाहीर भूमिका मांडली. शिवसेनेचे दोन भाग करायचे, एकाला हाताशी धरायचे आणि दुसऱ्यांवर अन्याय करायचा. दुसऱ्याला धरुन तिसऱ्यावर अन्याय करायचा, असे भारतीय जनता पक्षाचे काही नेते करीत आहेत. मोठा भाऊ आम्हाला संपवत आहे, असा आरोप अब्दुल सत्तार यांनी सोमवारी केला. त्यानंतर भाजपला आव्हान देण्यासाठी दोन्ही शिवसेना एकत्र येणार का, या चर्चांना उधाण आलं. मात्र या चर्चा फेटाळत आमची शिवसेना हीच खरी शिवसेना असून बाळासाहेबांची विचारधारा पुढे नेत आहे आणि याच शिवसेनेला लोकांनी पसंत दिली असल्याचं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. विधानपरिषदेच्या ठाणे मतदारसंघातून रवींद्र फाटक यांचा उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेना विलीनीकरणाच्या चर्चांवर भाष्य केलं. बाळासाहेब ठाकरेंची हिंदुत्वाची विचारधारा घेऊन आम्ही पुढे जात आहोत. सर्वसामान्यांच्या हिताचं सरकार आम्ही महाराष्ट्रात



दुसऱ्यांदा स्थापन केलं आहे. राज्यातील जनतेनेही नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही शिवसेनेवर, धनुष्याबाण चिन्हावर आणि बाळासाहेब व आनंद दिघेसाहेब यांच्या विचारांवर आपला विश्वास दाखवत आम्हाला विजयी केलं आहे. शिवसेनेचा हा विजयरथ यापुढेही सुरू राहील, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्रातील विधान परिषदेच्या सर्व १७ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी होतील,फ असा विश्वासही एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. विधान परिषद निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार रवींद्र फाटक यांचा उमेदवारी अर्ज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात शिंदे यांच्या उपस्थितीत दाखल केला. शिंदे यांनी फाटक यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी आनंदआश्रमात जाऊन बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघे यांनाअभिवादन केले. विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत उमेदवारीबाबत तिढा कायम होता. अखेर अपेक्षेप्रमाणे महायुतीकडून शिवसेनेचे रवींद्र फाटक यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडली. फाटक यांनी गेल्या टर्ममध्ये या जागेवरून निवडणूक लढवत विजय मिळवला होता. त्यामुळे शिवसेनेने पुन्हा एकदा त्यांनाच संधी दिली. तसेच महाविकास आघाडीच्या जागावाटपामध्ये ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे (शप) असल्याने या जागेवर पक्षाने ठाणे महापालिकेचे गटनेते अभिजीत पवार यांना उमेदवारी दिली. त्यामुळे या जागेसाठी दोन ठाणेदारांमध्ये लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले. फाटक यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपचे माजी खासदार कपिल पाटील, भाजपचे आमदार माधवी नाईक व कुमार आयलानी, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव उपस्थित होते.

# लाडकी बहीण योजनेतून लाखो महिला अपात्र, पुन्हा समावेश होणार की नाही? मंत्री गिरीश महाजनांकडून महत्त्वाची माहिती...

**वृत्तसंस्था जळगाव**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणफ योजनेतील अर्जांच्या छाननीमध्ये मोठ्या प्रमाणावर महिला अपात्र ठरल्याच्या मुद्द्यावर विरोधकांनी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावर ङ्गही केवळ तांत्रिक अडचण असून, ती दूर करण्यात येईल. महिलांनी काळजी करू नये, अशी ग्वाही जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत ई-केवायसी आणि कागदपत्रांच्या कडक पडताळणीनंतर तब्बल ७० ते ८० लाख महिलांचे अर्ज अपात्र ठरले. या मोठ्या छाननी प्रक्रियेनंतर राज्यातील पात्र लाभार्थी महिलांची अंतिम संख्या १ कोटी ६६ लाखांवर आली आहे. या सर्व घडामोडींवर मंत्री गिरीश महाजन यांनी जळगावात पत्रकारांशी बोलताना स्पष्टीकरण दिले. महाजन म्हणाले, अनेक महिलांचे अर्ज अपात्र ठरण्यामागे काही राजकीय हेतू नसून ही केवळ तांत्रिक अडचणफ आहे. अनेक महिलांना कागदपत्रे जोडण्यात किंवा ई-केवायसी पूर्ण करण्यात अडचणी आल्या आहेत. आम्ही यासाठी आधीही मुदतवाढ दिली होती. ही तांत्रिक अडचण दूर करण्यासाठी शासन स्तरावर नक्कीच सकारात्मक निर्णय घेतला जाईल.गिरीश महाजन म्हणाले की, ज्या महिलांच्या अर्जांमध्ये तांत्रिक चुका आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य निर्णय घेतला जाईल. काही विरोधक हे केवळ बोलबच्चन नेते आहेत. जनतेमध्ये त्याचा प्रभाव उरलेला नाही. निवडणुकीच्या भीतीने ते केवळ




आरोप करत आहेत. मात्र, जनतेचा विश्वास सरकारवरच असल्याचे त्यांनी सांगितले.

# खरोखर सोन्याची खाण?




आंध्र प्रदेशातील खनिजसमृद्ध कुर्नूल जिल्ह्यात ङ्गजोनागिरी गोल्ड प्रोजेक्टफ ही सोन्याची खाण आकारास आली असून भारतासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचा दावा करण्यात येत आहे. जिओम्हैसूर सर्व्हिसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या खासगी कंपनीच्या मालकीचा हा प्रकल्प असून, जून महिन्यात या प्रकल्पाचे उद्घाटन होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भारतात सोन्याला केवळ मौल्यवान धातू म्हणून नव्हे, तर सांस्कृतिक आणि आर्थिक सुरक्षिततेच्या भूमिकेतून म्हणूनही विशेष महत्त्व आहे. बचत आणि गुंतवणुकीसाठी सोन्याला भारतीयांची कायम पसंती राहिली आहे. परिणामी, भारत हा सोन्याच्या आयातदार देशांपैकी जगातील प्रमुख देश आहे. दरवर्षी सुमारे ७०० ते ८०० टन सोने आयात केले जाते. त्यासाठी परकीय चलन मोठ्या प्रमाणात खर्च होते. सध्या भारताच्या एकूण आयात खर्चात सोन्याचा वाटा सुमारे नऊ टक्के असून, कच्च्या तेलानंतर सोन्याचा क्रमांक दुसरा आहे. दुसरीकडे, देशांतर्गत सोन्याचे उत्पादन मात्र अत्यंत मर्यादित आहे. देशातील सोन्याच्या खाणींच्या उद्योगात सरकारी कंपन्यांचाच वरचष्मा राहिला आहे. सरकारी मालकीची ङ्गहुट्टी गोल्ड माइन्सफ हीच प्रमुख उत्पादक कंपनी असून, ती दर वर्षी सुमारे १.५ टन सोने उत्पादन करते. नॅशनल मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनसारख्या नवरत्न कंपनीने काही प्रमाणात सोन्याचे उत्पादन सुरू केले असले, तरी त्यासाठी परदेशातील खाण प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यात आली आहे. एके काळी देशातील सर्वांत प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या कर्नाटकातील ङ्गकोलार गोल्ड फील्ड्सफने २००० साली उत्पादन बंद केले. १९९०च्या दशकाच्या अखेरीस, येथून सोने काढण्याचा खर्च हा मिळालेल्या सोन्यापेक्षा अधिक झाला. चांगल्या दर्जाचे सोने काढण्यात आल्यानंतर, येथे कमी दर्जाचे सोने उरले होते. येथील खाणी सोन्याच्या सर्वाधिक खोल खाणींपैकी एक होत्या, हेही मोठ्या खर्चाचे कारण होते. सोने उत्पादन करणे अव्यवहार्य झाल्याने कोलारमधून उत्पादन थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर भारताचे सोन्यासाठी आयातीवरील अवलंबित्व वाढले. यातच, मागील काही महिन्यांत वाढलेल्या किमती आणि आयात प्रक्रियेतील प्रशासकीय आणि कार्यात्मक अडथळे या कारणांमुळे सोन्याच्या आयातीत मोठी घसरण झाली आहे. जानेवारी २०२६ मध्ये जवळपास १०० टन असलेली आयात फेब्रुवारीत ६५ ते ६६ टन, तर मार्चमध्ये २० ते २२ टनांपर्यंत घसरली. करोनाकाळाचा अपवाद वगळता गेल्या तीन दशकांतील हा सर्वांत कमी मासिक आकडा मानला जात आहे. अशातच, अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर परकीय चलन वाचवण्याच्या दृष्टीने अनावश्यक सोनेखरेदी टाळण्याचे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केल्याने सोन्याबाबत चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. अशा परिस्थितीत जोनागिरीच्या खाणीकडे विशेष लक्ष वेधले जात आहे. जोनागिरी प्रकल्प कुर्नूल जिल्ह्यातील जोनागिरी, एरागुडी आणि पागिडिरायी या गावांमध्ये जवळपास ५९८ हेक्टर क्षेत्रावर विस्तारलेला आहे. त्रिवेणी अर्थमूव्हर्स अँड इन्फ्रा आणि डेक्कन गोल्ड माइन्स लिमिटेडसारख्या मोठ्या खाण कंपन्यांशी संबंधित जिओम्हैसूर इंडिया प्रा. लि. ही कंपनी हा प्रकल्प विकसित करत आहे. या प्रकल्पात सुमारे ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. प्राथमिक सर्वेक्षणानुसार जोनागिरी परिसरात सुमारे १३ टन सोन्याचे साठे असल्याचे प्रमाणित करण्यात आले आहे. खाणकाम सुरू झाल्यानंतर पुढील १५ वर्षे हा प्रकल्प कार्यरत राहू शकतो आणि एकूण उत्पादन ४० ते ४२ टनांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. पहिल्याच वर्षी ८०० किलो सोन्याचे उत्पादन करण्याचे लक्ष्य कंपनीने ठेवले असून, पुढील टप्प्यात ते उत्पादन एक हजार किलोपर्यंत वाढवण्याची योजना आहे, असे कंपनीशी संबंधित उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. भारताच्या सोन्याच्या एकूण गरजेच्या तुलनेत जोनागिरी खाणीतील अंदाजे उत्पादन अत्यल्प आहे, याकडे तज्ज्ञ लक्ष वेधत आहेत. या नवीन खाणप्रकल्पामुळे होणारा आर्थिक परिणाम नगण्य असल्याचे मत कमॉडिटी तज्ज्ञ श्रीकांत कुवळेकर यांनी व्यक्त केले. खाणींसाठी प्रचंड मोठी गुंतवणूक गरजेची असते, सातत्याने खर्च आवश्यक असतो आणि त्या तुलनेने उत्पादन हाती येण्यासाठी अधिक कालावधी लागतो. जमिनीत किती खोलीवर खनिज मिळणार आहे, त्यावरही खर्च अवलंबून असतो. देशांतर्गत सोन्याच्या मागणीचा विचार करता आजवर आपल्या खाणींमधून होणाऱ्या सोन्याच्या उत्पादनाचे प्रमाण अगदीच अत्यल्प आहे आणि पुढील एखादे दशक तरी यात बदल संभवत नाही. त्यामुळे व्यवहार्यता हा महत्त्वाचा मुद्दा ठरतो. दुसरीकडे, देशात सोन्याची आयात वर्षाला ७०० ते ८०० टन एवढी आहे, त्याशिवाय जवळजवळ १०० ते १५० टन सोने तस्करीच्या मार्गाने आणले जाते, असा अंदाज आहे. ही वस्तुस्थिती पाहता नवीन खाणीमुळे देशाची सोन्याची मागणी पुरवली जाण्याची शक्यता नाही, असे स्पष्ट मत श्रीकांत कुवळेकर यांनी व्यक्त केले. दुसरीकडे जोनागिरी प्रकल्पामुळे आर्थिकदृष्ट्या तसेच धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या सोने आणि इतर खनिजांच्या उत्खननाला चालना मिळू शकते, असे मतही व्यक्त होत आहे. आठशे ते एक हजार टन सोने आयात आणि जेमतेम दीड टनांचे देशांतर्गत होणारे उत्पादन हे असंतुलन या खाणीमुळे तातडीने भरून येणार नसले, तरी धोरणात्मकदृष्ट्या ही खाण महत्त्वाची ठरेल, असे मत सर्टिफाइड फायनान्शिअल प्लॅनर आनंद म्हाप्रळकर यांनी व्यक्त केले. जोनागिरी प्रकल्पासाठी ४०० कोटींची गुंतवणूक आली आहे. देशात मौल्यवान खनिजांचे आतापर्यंत शोधले न गेलेले साठे आहेत, त्यांच्या शोधासाठी या प्रकल्पामुळे मोठी चालना मिळू शकते. अमेरिकेतील व्याजदर, सेंट्रल बँकांकडून खरेदी, भूराजकीय परिस्थिती आणि जागतिक कल यांवर भारतातील सोन्याचे दर अवलंबून असतात. त्यामुळे नवीन खाणीमुळे सोन्याच्या किंमतींवर तातडीने परिणाम होणार नाही. मात्र नवीन खाणप्रकल्प प्रत्यक्षात आल्यास या उद्योगासाठी तसेच आयातीवरील अवलंबित्व काही अंशी कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते. आंध्र प्रदेशात रोजगार, पायाभूत सुविधांचा विकास यांना बळ मिळू शकते, याकडे आनंद म्हाप्रळकर यांनी लक्ष वेधले.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कोकण विधान परिषदेसाठी मविआ कडून बाळ माने तर महायुतीकडून तटकरे यांचा अर्ज दाखल

**रत्नागिरी/वृत्तसंस्था**

रत्नागिरी-सिंधुदुर्ग-रायगड कोकण स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद मतदारसंघाच्या निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढत असून महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. सोमवारी दोन्ही आघाड्यांच्या अधिकृत उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले. मात्र, भाजपचे आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्या जुईली दळवी यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. त्यामुळे या निवडणुकीत महायुतीतच अंतर्गत संघर्ष उभा राहिल्याची चर्चा रंगू लागली आहे.

महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा अधिकृत उमेदवार अनिकेत तटकरे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी मनुज जिंदल यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी एकजूट दाखवत मोठी उपस्थिती लावली. मंत्री उदय सामंत, मंत्री नितेश राणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, आमदार दीपक केसरकर यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. महायुतीने ही जागा प्रतिष्ठेची मानून निवडणुकीत पूर्ण ताकद लावण्याचे संकेत या शक्तिप्रदर्शनातून दिले.

दुसरीकडे, महाविकास आघाडीकडून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार बाळ माने यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करताना आमदार भास्कर जाधव, जिल्हाप्रमुख विक्रांत जाधव, मिहीर माने तसेच माधवी माने यांच्यासह आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. कोकणातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असलेल्या संपर्काच्या जोरावर ही जागा जिंकण्याचा निर्धार महाविकास आघाडीने व्यक्त केला आहे. मात्र, अधिकृत उमेदवारांच्या अर्जापेक्षा अपक्ष उमेदवारांच्या एन्ट्रीमुळेच राजकीय चर्चांना अधिक वेग आला आहे. जुईली महेंद्र दळवी, ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अरविंद पुंडलिक म्हात्रे आणि अनिल रमेश चोपडा यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामध्ये विशेष लक्ष वेधून घेतले ते जुईली दळवी यांच्या अर्जाने. त्या भाजपचे आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्या असल्याने त्यांच्या अपक्ष उमेदवारीमागे नेमका काय राजकीय हेतू आहे, याबाबत तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे.



राजकीय जाणकारांच्या मते, जुईली दळवी यांचा अर्ज हा केवळ तांत्रिक किंवा राजकीय दबावतंत्राचा भाग आहे की महायुतीतील काही नाराजीचे संकेत आहेत, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेपर्यंत या चर्चांना आणखी वेग मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कोकण विधान परिषद मतदारसंघ हा पारंपरिकदृष्ट्या राजकीयदृष्ट्या संवेदनशील मानला जातो. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या तीन जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींचे मतदान निर्णायक ठरणार आहे. त्यामुळे प्रत्येक मताला महत्त्व प्राप्त झाले असून महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही बाजूंनी जोरदार राजकीय मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेनंतर आता सर्वांचे लक्ष अर्ज छाननी आणि संभाव्य माघारींकडे लागले आहे. अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या मैदानात कायम राहतात की राजकीय समीकरणांनुसार माघार घेतात, यावरही निवडणुकीचे चित्र काही प्रमाणात अवलंबून राहणार आहे. कोकण विधान परिषद निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात प्रतिष्ठेची लढत रंगणार असली, तरी जुईली दळवी यांच्या अपक्ष उमेदवारीने या निवडणुकीत उत्सुकता आणि राजकीय गूढता अधिकच वाढवली आहे. आगामी काही दिवसांत घडणाऱ्या राजकीय घडामोडींमुळे कोकणच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## सावंतवाडी, दोडामार्ग आणि मालवण एसटी डेपो पीपीपी तत्वावर उभारणार : प्रताप सरनाईक

**सावंतवाडी/वृत्तसंस्था**

सावंतवाडी, दोडामार्ग आणि मालवण येथील एसटी बस डेपो खाजगी पीपीपी (सार्वजनिक-खाजगी भागीदारी) तत्वावर विकसित करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला असून, येत्या ऑगस्ट महिन्यात यासाठीच्या निविदा काढण्यात येणार आहेत. तसेच, डिझेल दरवाढीमुळे एसटी महामंडळाला ३१० कोटी रुपयांचा आर्थिक फटका बसत असला, तरी सध्या तरी कोणतीही तिकिट दरवाढ केली जाणार नाही, अशी महत्त्वाची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी येथे दिली. परिवहन मंत्र्यांनी आज सावंतवाडी डेपोला भेट देऊन पाहणी केली, त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

स्थानिक आमदार दीपक केसरकर यांच्या कार्यालयात परिवहन मंत्र्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख संजू परब, सावंतवाडी तालुका प्रमुख नारायण राणे, दिनेश गावडे, दोडामार्ग तालुका प्रमुख व उपसभापती गणेशप्रसाद गवस, सुधा कवठणकर, मायकल डिसोझा,अशोक दळवी, प्रेमानंद देसाई, सभापती सुष्मिता जाधव, सचिन वालावलकर, गोपाळ गवस, राजन रेडकर, क्लेटस फर्नांडिस, गोविंद वाडकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

परिवहन मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, येत्या १ जूनपासून राज्यातील सर्व एसटी डेपोमधील स्वच्छतागृहे आणि शौचालये प्रवाशांसाठी पूर्णपणे मोफत करण्यात आली आहेत. तसेच सर्व डेपोंमध्ये यांत्रिक पद्धतीने स्वच्छता राखली जाईल आणि तेथे सौर ऊर्जा तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सावंतवाडी एसटी डेपो हा बारामतीच्या धर्तीवर सर्व सुविधायुक्त व आधुनिक 'पोर्ट' प्रमाणे विकसित केला जाईल, ज्यामध्ये सर्वसामान्य प्रवाशांच्या सोयींना प्राधान्य दिले जाईल.

## लाडकी बहीण योजनेतून १.२५ कोटी महिला बाहेर? सुप्रिया सुळेंची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**परभणी/वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या घटत्या संख्येवरून राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. सुरूवातीला तब्बल २ कोटी ३८ लाख महिलांना लाभ दिल्याचा दावा करणार्या सरकारचे पोर्टल आता केवळ १ कोटी ६ लाख मंजूर अर्ज दाखवत असल्याकडे लक्ष वेधत, सुळे यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी आणि स्वतंत्र ऑडिट करण्याची मागणी केली आहे.



सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' (ट्विटर) वर पोस्ट करत सरकारला काही कडक सवाल विचारले आहेत. डिसेंबर २०२४ पर्यंत २.३८ कोटी महिलांना ₹१७ हजार ५०५ कोटींपेक्षा अधिक रक्कम वितरित झाल्याचा दावा सरकारने केला होता. पुढे ही संख्या २.४८ कोटींवर गेली. e-KYC बंधनकारक केल्यानंतर लाभार्थी संख्या वेगाने घटली. सध्या माध्यमांनुसार सुमारे ८० लाख महिला अपात्र ठरल्या असून १.६६ कोटी महिलांनाच लाभ मिळणार असल्याचे समोर येत आहे. प्रत्यक्ष सरकारी पोर्टलवर एकूण अर्ज फक्त १.१२ कोटी आणि मंजूर अर्ज केवळ १.०६ कोटी दिसत आहेत. याचा अर्थ डिसेंबर २०२४ च्या तुलनेत तब्बल १.२५ कोटींहून अधिक महिला योजनेतून बाहेर पडल्याचे चित्र आहे.

पोर्टलवरील आणि सरकारच्या दाव्यांमधील या मोठ्या तफावतीवर बोट ठेवत सुप्रिया सुळे यांनी सरकारला धारेवर धरले. त्या म्हणाल्या, "हा पैसा जनतेच्या घामाचा आणि कराचा आहे. जर आज पोर्टलवर एवढी कमी संख्या दिसत असेल, तर सुरुवातीचे लाभार्थी नेमके कोण होते? गेली वर्ष-दीड वर्ष सरकार अपात्र लोकांना जनतेचा पैसा वाटत होते का?" हा प्रकार म्हणजे सरकारचे घोर अपयश असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील प्रत्येक पात्र भगिनीला या योजनेचा लाभ नियमितपणे मिळालाच पाहिजे, अशी ठाम भूमिका सुप्रिया सुळे यांनी मांडली आहे. आता यावर सरकार काय स्पष्टीकरण देते, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## लाडकी बहीण योजनेतून ८० लाख महिला अपात्र? तटकरेंनी अखेर मौन सोडले

**मुंबई/वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांची ई-केवायसी झाल्यानंतर जवळपास ८१ लाख महिलांना अपात्र ठरवण्यात आलं आहे. ई-केवायसीनंतर या योजनेत १ कोटी ६६ लाख बहिणी अनुदानासाठी पात्र ठरल्या आहेत. यावरून राज्यात गदारोळ निर्माण झाला आहे. दरम्यान, यावरून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अनिकेत तटकरे यांनी विधान परिषद निवडणुकीचा अर्ज भरल्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या.



आदिती तटकरे यांना आज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून ८१ लाख अर्ज बाद झाल्याबाबत विचारण्यात आलं. त्या म्हणाल्या, अर्ज बाद झालेले नाहीत. याजनेसाठी ई-केवायसीची प्रक्रिया गेल्यावर्षी ऑगस्टपासून सुरू झाली. केवायसी पूर्ण करण्याकरता सुरुवातीला तीन महिन्याचा कालावधी दिला. त्यानंतर दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली. त्यामुळे एकूण आठ-दहा महिन्यांची वाढ झाली होती."

"ई केवायसी फक्त लाडकी बहीण योजनेत नाहीय. तर, राज्याच्या ज्या ज्या डीबीटी योजना आहेत, त्या सर्वांना ई केवायसीची प्रक्रिया केली जाते. ८१ लाख आकड्यात फक्त ई-केवायसीच्या महिला नाहीत. तर, मुदतीत ई केवायसी न केलेल्या महिलाही आहेत. तसंच, गेल्या दहा महिन्यांपासून आयकर विभागाकडून डेटा मागवलेला होता. ज्यांचं उत्पन्न २ लाखांपेक्षा जास्त आहे, अशा जवळपास १२ लाख महिलांचाही या ८१ लाख अपात्र महिलांमध्ये समावेश आहे. तर, ६५ वर्षांवरील साडेचार लाख महिलांचा समावेश आहे. १४ हजार महिला या सरकारी कर्मचारी होत्या, त्यामुळे त्यांनाही वगळण्यात आलं आहे", असं आदिती तटकरे म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या, ई-केवायसी करूनही ज्या महिलांना लाभ मिळणे झाला आहे, त्यांची फेरतपासणी करण्यात येणार आहे. कारण, कोणीही पात्र महिला लाभापासून वंचित राहता कामा नये. या छाननीमधून संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांनाही वगळण्यात आलं आहे. कारण, दोन्हीपैकी एकाच शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे. तर, ज्यांच्या नावावर वाहन आहे, त्यांनाही या योजनेतून वगळलं आहे. पण त्यातीलही काही लाभार्थ्यांनी वाहन नसल्याची तक्रार केली आहे. त्यामुळे त्यांचीही फेरतपासणी होणार आहे."

# योगेशचा झाला ‘सिकंदर’; 22 जणांचा जीव घेणाऱ्या तरुणाबद्दल धक्कादायक माहिती

■ पुणे/वृत्तसंस्था

विषारी दारूकांड प्रकरणातील मुख्य आरोपी योगेश व्हानकडे याने खरी ओळख लपविण्यासाठी चक्क 'सिकंदर राठोड' हे काल्पनिक नाव धारण केल्याचे तपासात उघड झाले आहे. मागील तीन वर्षांपासून बेकायदा दारूविक्रीचा काळा धंदा करताना पोलिस आणि उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी तो खोट्या नावाने वावरत होता.मिथेनॉल'मिश्रित गावठी दारूच्या सेवनाने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये वीसहून अधिक जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी योगेश रामचंद्र व्हानकडे (वय २३, रा. केशवनगर, मुंढवा), कर्नेलसिंग तखतसिंग विरका (वय ७३), गुरमंतसिंग कर्नेलसिंग विरका (वय ४५, दोघे रा. संजयनगर, फुगेवाडी), राधेश्याम हरिराम प्रजापती (वय ३५, रा. उरुळी कांचन) यांना पुणे न्यायालयाने १० जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात दापोडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार योगेश राजेंद्र व्हानकडे (वय २३) हा मूळचा सोलापूर जिल्ह्यातील बेलाटी लमाण तांडा येथील रहिवासी आहे. रोजगाराच्या निमित्ताने तो काही वर्षांपूर्वी पुण्यात आला. सुरुवातीला कुंजीरवाडी आणि घोरपडी भागांत राहिल्यानंतर, गेल्या पाच महिन्यांपासून तो केशवनगर परिसरातील गुरुकृपा सोसायटीत आई-वडिलांसह राहत होता. स्वतःला सर्वसामान्य नागरिक भासविणारा योगेश प्रत्यक्षात तीन वर्षांपासून दारूविक्री व्यवसायात सक्रिय असल्याचे तपासात उघड झाले आहे.

उरुळी कांचन परिसरातील राजू प्रजापती उर्फ राधेश्याम गोयल हा या साखळीतील त्याचा मुख्य पुरवठादार होता. योगेश हा प्रजापतीकडून ३५ लिटर क्षमतेचा एक हातभट्टीचा कॅन १७०० ते १८०० रुपयांना विकत घ्यायचा. त्यानंतर ही दारू पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या विविध भागांतील बेकायदा मद्य विक्रेत्यांना पुरवित होता. योगेश याच्याविरोधात मुंढवा आणि हडपसर पोलिस ठाणे आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून एकूण तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बेकायदा दारूची वाहतूक, साठा आणि विक्री प्रकरणात त्याच्यावर यापूर्वी कारवाया झाल्या.

## जमीन हादरली, नागरिक भेदरले, हिंगोलीतील गावांना भूकंपाचा धक्का...

■ हिंगोली/वृत्तसंस्था

हिंगोली जिल्ह्यातील काही गावांमध्ये आज दुपारच्या वेळी अचानक भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. विशेष म्हणजे यावेळी गूढ आवाज देखील येत होता. यामुळे नागरिक भयभीत झाले. नेमकं काय होत आहे ते नागरिकांना समजत नव्हते. यावेळी काही नागरिकांनी घराबाहेर पडणं पसंत केलं. भूगर्भात काहीतरी हालचाली घडल्यामुळे संबंधित प्रकार घडल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही अप्रिय घटना घडलेली नाही. आता सर्व सुरळीत झालं आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका, असं आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केलं आहे.हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील पांगराशिंदे या गावात आणि परिसरात आज दुपारी 3 वाजून 27 मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. हा भूकंप 3.5 रिस्टल स्केल तीव्रतेचा भूकंप नोंदविण्यात आला आहे. हे भूकंपाचे धक्के वारंवार जाणवत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड चिंतेचे वातावरण आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी. तसेच कोणतीही आपत्कालीन माहिती प्राप्त झाल्यास स्थानिक प्रशासनाची संपर्क साधावा, असे आवाहन




हिंगोली जिल्हाधकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.याविषयी सविस्तर माहिती अशी की, हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे आणि परिसरातील गावांमध्ये आज भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. त्याचबरोबर भूगर्भातून गूढ आवाज येऊ लागल्याने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. 3 वाजून 27 मिनिटांनी झालेल्या या भूकंपाची तीव्रता 3.5 स्केल एवढी नोंदविण्यात आली आहे. पांगराशिंदे गावासह आजूबाजूच्या बऱ्याच गावांमध्ये भूगर्भातून आवाज येत असल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये मात्र प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. मात्र वारंवार येत असलेल्या भूकंपाच्या धक्क्यांमुळे नागरिकांमध्ये भीती आणि अस्वस्थता वाढली आहे.हिंगोली जिल्ह्यातील काही ठिकाणी भूगर्भातून आवाजासह भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला आहे.

## भीषण अपघातात दोघे दगावले, 15 जखमी

**शिर्डी :** शिर्डी-नाशिक महामार्गावर रविवारी दुपारी भीषण अपघात होऊन दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले. सावळीविहीर हद्दीत राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बस आणि एर्टिगा कार यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाल्याने ही दुर्घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, पनवेलहून शिर्डीकडे येणारी एसटी बस आणि नाशिकच्या दिशेने जाणारी एर्टिगा कार यांच्यात हा अपघात झाला. धडकेची तीव्रता इतकी होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. तसेच एसटी बसच्या पुढील भागाचेही मोठे नुकसान झाले आहे.अपघाताची माहिती मिळताच पोलीस, रुग्णवाहिका आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने बाहेर काढून शिर्डी येथील साई संस्थानच्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.या अपघातात मृत झालेल्या दोघांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी महामार्गावरील सुरू असलेल्या रस्ते कामामुळे वाहनचालकांचा अंदाज चुकला असावा.

## राजस्थानमध्ये वादळ पुन्हा येण्याची शक्यता, 80 किमी प्रतितासने वारे वाहणार

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

देशात वेगवेगळ्या ठिकाणी हवामानात वेगाने बदल होताना दिसत आहेत. हवामान विभागाने केलेल्या संशोधनात फार महत्त्वाची माहिती समोर आली आहे. भारताच्या उत्तर-पश्चिम भागात वातावरणात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. राजस्थानमध्ये तब्बल 80 किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. यामुळे हवामान विभागाकडून सर्वसामान्यांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतही वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये डोंगराळ भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.राजस्थानमध्ये धुळीचे भयानक वादळ बघायला मिळालं. यानंतर आता हवामान विभागाकडून पुन्हा असा इशारा देण्यात आला आहे. राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशात 80 किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. इथे वातावरण पुन्हा रौद्र रुप धारण करण्याची शक्यता आहे. राजस्थानमध्ये पुन्हा धुळीचे मोठे वादळ येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे धुळीचे वादळ हे दिल्ली आणि पंजाबमध्ये देखील येण्याची शक्यता आहे. याच वेळी उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात



बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आगामी काही दिवसांमध्ये राजस्थानमध्ये धुळीचे वादळ येण्याची शक्यता आहे. यावेळी वाऱ्याचा वेग हा ताशी 80 किमी इतका असण्याची शक्यता आहे. तर दिल्लीत 40 ते 50 किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. याचवेळी विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा, जम्मू-काश्मीर इथे देखील वादळी पावसाची शक्यता आहे. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात उंचावरच्या भागात बर्फवृष्टी आणि मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर दक्षिणेत आंध्र प्रदेशाच्या किनारी भागात वाऱ्याचा वेग हा ताशी 70 किमी इतका असण्याची शक्यता आहे.

देशात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे वातावरण बघायला मिळत आहे. एकीकडे महाराष्ट्रात चंद्रपूरमध्ये सर्वाधिक 44.8 डिग्री सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

## 12 स्थानकं, डोंगरांमधून 7 बोगदे, देशात पहिल्यांदाच समुद्राखाली रेल्वे मार्ग

■ मुंबई/वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे माजी पंतप्रधान शिंजो आबे यांच्या उपस्थितित भारतातील पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पाची सप्टेंबर 2017 पायाभरणी झाली. जपान, चीन आणि फ्रान्ससारख्या देशांमध्ये अनेक वर्षांपासून हाय-स्पीड रेल्वे जाळे विस्तारले आहे. भारतानेही त्या दिशेने मोठं पाऊल टाकलं. या गोष्टीला नऊ वर्ष उलटले. आता बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामात मोठं यश मिळत असून लवकरच भारतातही हाय-स्पीड रेल्वे धावेल.गुजरात आणि महाराष्ट्र या दोन राज्यांमध्ये भारतातील पहिल्या बुलेट ट्रेनचं काम सुरू आहे. मुंबईजवळ समुद्राखाली बोगद्यामधून बुलेट ट्रेनचा मार्ग तयार करण्यात येत आहे. दोन्ही राज्यांमध्ये प्रस्तावित स्थानकांचं बांधकाम सुरू आहे. पहिल्यांदाच पूर्णपणे



भारतात तयार केलेली ही हाय-स्पीड ट्रेन 2027पर्यंत प्रवाशांसाठी खुली होईल अशी अपेक्षा आहे. गुजरात आणि महाराष्ट्रात या प्रकल्पासाठी व्हायडक्ट तयार केले जात आहेत.

पण हा प्रकल्पसुद्धा विलंबाच्या विळख्यात सापडला होता. भूसंपादनापासून, खर्चामध्ये होणारी वाढ ते अभियांत्रिकी संकटांपर्यंत बुलेट ट्रेनसमोर अनेक अडथळे आली. पण या सर्व अडथळ्यांना सामोरे गेल्यानंतर आता हा प्रकल्पा एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर पोहोचला आहे. सरकारने वर्षानुवर्ष दाखवलेलं स्वप्न अखेर सत्यात उतरताना दिसतयं.भारतातील पहिल्या बुलेट ट्रेनच्या बांधकामाची सुरूवात 2017मध्ये जरी झाली असली तरी यासाठी अनेक वर्षांपासून चर्चा सुरू होत्या. मुंबई ते अहमदाबाद रेल्वे मार्गावर दररोज व्यावसायिक, कर्मचारी मोठ्या संख्येने प्रवास करतात. त्यामुळे या मार्गावर हाय-स्पीड रेल्वे मार्ग उभारण्याची आवश्यकता होती. जपानच्या शिंकांसेन सिस्टिमच्या सहाय्याने देशातील पहिला बुलेट ट्रेन कॉरिडोर विकसित केला जात आहे. जगातील सर्वात सुरक्षित आणि प्रगत तंत्रज्ञांपैकी हे एक आहे.मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल कॉरिडोर 508 किलोमीटर लांब असेल. महाराष्ट्र, गुजरात या राज्यांसह दमन आणि दीव, दादरा आणि नगर-हवेली या केंद्रशासित प्रदेशांमधून ही बुलेट ट्रेन धावणार. रेल्वे मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार या मार्गावर एकूण 12 स्थानकं असतील. मुंबई, ठाणे, विरार, बोईसर, वापी, बिलिमोरा, सुरत, भारुच, बडोदा, आनंद, अहमदाबाद आणि साबरमती या स्थानकांचा समावेश आहे. NHSRCLकडून या बुलेट ट्रेनचा विकास होत आहे.

या मार्गावरील बुलेट ट्रेन ताशी 320 किमी वेगाने प्रवास करेल. मुंबई ते अहमदाबाद सुपरफास्ट प्रवास शक्य होणार आहे. सामान्य रेल्वेने या दोन शहरांमधील प्रवासासाठी 7 तास लागतात. सध्या वंदे भारतमुळे सर्वात वेगवान प्रवास शक्य आहे. कवेळ 5.30 तासांत अंतर पार होतं. बुलेट ट्रेनमुळे हाच प्रवास 2 तासांत पूर्ण होणार आहे.

# आरसीबीची सलग दुसऱ्या जेतेपदाला गवसणी

**■ मुंबई, वृत्तसंस्था :**

आयपीएल २०२६ स्पर्धेतील अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने गुजरात टायटन्सवर ५ गडी राखून विजय मिळवला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा संघ १५६ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. हे आव्हान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने १८ व्या षटकात पूर्ण केलं.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुला लागोपाठ दुसऱ्यांदा विजय मिळवण्यासाठी अवघ्या १५६ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी वेंकटेश अय्यर आणि विराट कोहलीची जोडी डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानावर आली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी केली. वेंकटेश अय्यरने ३२ धावांची खेळी केली. तर विराट कोहलीने नाबाद ७५ धावा चोपल्या. देवदत्त पडिक्कल १ धाव करुन बाद झाला. त्यानंतर टीम डेव्हिड २४ आणि कृणाल पंड्या १ धाव करुन माघारी परतला. शेवटी विराटने षटकार मारुन रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुला विजय मिळवून दिला.

या सामन्यात गुजरात टायटन्सचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. प्रथम फलंदाजी करताना गुजरात टायटन्सला नेहमीप्रमाणे हवी तशी सुरुवात मिळाली नाही. साई सुदर्शन अवघ्या १२ तर शुबमन गिल अवघ्या १० धावा करुन माघारी परतला. त्यानंतर निशांत सिंधू २० धावांवर माघारी परतला. जोस बटलर १९ धावा करुन माघारी परतला. अर्शद खानने १५, राहुल तेवातियाने ७ , जेसन होल्डरने ७ आणि शेवटी वॉशिंग्टन सुंदरने नाबाद ५० धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर गुजरात टायटन्सने २० षटकांअखेर ८ गडी बाद १५५ धावा केल्या. आरसीबीचा संघ स्पर्धेदरम्यान सातत्याने सामने गमावले होते, त्यावेळीस संघाने कमबॅक कसं केलं, हे विराटने सांगितलं, "ब्रेकनंतर आम्हाला काही अडचणींचा सामना करावा लागला. एक पराभव झाला आणि मुंबई इंडियन्सविरुद्धचा विजयही खूप संघर्षपूर्ण होता. तो आठवडा आमच्यासाठी थोडा कठीण होता, कारण आम्हाला गुणतालिकेत अव्वल स्थान राखायचं होतं. पण मुंबईविरुद्धचा विजय मिळाल्यानंतर आमचा आत्मविश्वास पुन्हा वाढला. त्यानंतर कोलकाता नाईट रायडर्सवर मोठा विजय मिळवला आणि मग आम्ही थेट अव्वल स्थानासह अंतिम फेरीकडे वाटचाल केली." संघाच्या एकूण कामगिरीबद्दल आणि प्रत्येक खेळाडूच्या योगदानाबद्दल विराट म्हणाला, सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, संघात असे खेळाडू आहेत की ज्यांच्यासोबत खेळताना तुम्हाला असं वाटत नाही की संघासाठी प्रत्येक वेळी फक्त तुम्हालाच पुढे यावं लागेल. प्रत्येकजण जबाबदारी स्वीकारण्यासाठी तयार आहे आणि हीच आमच्या संघाची सर्वात मोठी ताकद आहे."



### रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु सगल दुसऱ्यांदा चॅम्पियन

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा संघ गेल्या १८ हंगामात एकही जेतेपदाची ट्रॉफी जिंकू शकला नव्हता. पण रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली खेळताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने आयपीएल स्पर्धेत इतिहास घडवला आहे. गेल्या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने पंजाब किंग्सला पराभूत करत पहिल्यांदाच जेतेपदाची ट्रॉफी उंचावली होती. आता २०२६ स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सला पराभूत करुन जेतेपद राखलं आहे.

## बीसीसीआयचा मोठा निर्णय ! ऋतुराज गायकवाडला टीम इंडियात स्थान ; पराग बाहेर

**■ मुंबई/वृत्तसंस्था**

आयपीएल झाल्यानंतर भारतीय अ संघ ९ जूनपासून श्रीलंकेत होणाऱ्या तिरंगी मालिकेत झुंज देताना दिसून येणार आहे. या मालिकेसाठी आधीच भारतीय अ संघाची घोषणा करण्यात आली होती. या मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघाची जबाबदारी युवा फलंदाज रियान परागकडे सोपवण्यात आली होती. तर उपकर्णधारपदाची जबाबदारी रियान परागकडे सोपवण्यात आली होती. पण ही मालिका सुरू होण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना बीसीसीआयकडून भारतीय संघात मोठा बदल करण्यात आला आहे.

तिरंगी मालिका सुरू होण्याआधी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. रियान पराग हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे बाहेर झाला. त्याच्या जागी ऋतुराज गायकवाडला भारतीय अ संघात स्थान देण्यात आलं आहे. यासह उपकर्णधारपदाची जबाबदारी ऋतुराज गायकवाडकडे सोपवण्यात आली आहे. बीसीसीआयने रियान परागच्या दुखापतीबाबत अपडेट दिली आहे. तो हॅमस्ट्रिंगच्या दुखण्याने त्रस्त आहे. त्यामुळे तो बंगळुरुतील सेंटर ऑफ एक्सिलेन्समध्ये रिहॅब करण्यासाठी जाणार आहे. संजू सॅमसनने राजस्थान रॉयल्स संघाची साथ सोडल्यानंतर संघाच्या कर्णधारपदाची रियान परागकडे सोपवण्यात आली होती. त्याच्या नेतृत्वाखाली खेळताना राजस्थान रॉयल्स संघाने दमदार कामगिरी केली. राजस्थानला क्वालिफायर २ मध्ये गुजरात टायटन्स संघाकडून पराभवाचा सामना करावा लागला. तो आयपीएलच्या सर्व सामन्यांमध्ये खेळताना दिसून आला होता. पण आता तिरंगी मालिकेत तो दुखापीमुळे खेळताना दिसून येणार नाही.

## सिंगापूर बॅडमिंटन स्पर्धेत सा्त्विक-चिरागला जेतेपद

**■ मुंबई/वृत्तसंस्था**

सिंगापूर : भारताच्या सात्त्वाकिसाईराज रंकिरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने रविवारी सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत (सुपर ७५० दर्जा) पुरुष दुहेरीचे विजेतेपद मिळवले. अंतिम सामन्यात भारतीय जोडीने इंडोनेशियाच्या फजर अल्फियान आणि मुहम्मद शोहिबुल फिकरी जोडीचा १८-२१, २१-१७, २१-१६ असा पराभव केला.



अटीतटीच्या अंतिम लढतीत पहिला गेम गमाविल्यानंतर सा्त्विक-चिरागने आपल्या खेळाचा वेग वाढवला आणि प्रदीर्घ रॅलीजमध्ये वर्चस्व गाजवून जागतिक क्रमवारी तिसऱ्या स्थानावर असलेल्या इंडोनेशियाच्या जोडीचा पराभव केला. अंतिम लढतीत भारतीय जोडीची सुरुवात संथ होती. पहिल्या गेमला दोघेही चाचपडत खेळताना दिसले. सुरुवातीच्या पिछाडीनंतर भारतीय जोडीने प्रथम बरोबरी साधली. नंतर ११-९ अशी किरकोळ आघाडी घेतली. त्यानंतर गेम १६-१६, १७-१७, १८-१८ असा बरोबरीतच सुरू होता. मात्र, निर्णायक क्षणी झालेल्या चुकांमुळे भारतीय जोडीला पहिला गेम गमवावा लागला. दुसऱ्या गेमला भारतीय जोडीने गेमच्या मध्याला ११-८ आणि नंतर सलग सहा गुणांची कमाई करत आघाडी १७-८ अशी वाढवली. त्यानंतरही अखेरच्या टप्प्यात इंडोनेशियन जोडीने पिछाडी २०-१७ अशी भरून काढली. मात्र, चिरागच्या नेटवरील सुरेख खेळासमोर त्यांचा निभाव लागला नाही. निर्णायक गेममध्येही गुणांसाठी कमालीची चुरस बघायला मिळाली. भारतीय जोडीने ६-२, ११-६ अशी आघाडी वाढवत नेली. मात्र, त्यानंतर इंडोनेशियन जोडीने सलग सहा गुण घेत पिछाडी १२-११ अशी कमी केली. या स्थितीत भारतीय जोडीने संयम गमावला नाही. भारतीय जोडी २०-१५ अशा आघाडीवर असताना स्विहसला उशीर केल्यामुळे त्यांना 'यलो कार्ड' मिळाले. अर्थात, याचा फारसा फरक पडला नाही. भारतीय जोडीने पुढचाच गुण घेत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. या कामगिरीसह सा्त्विक-चिरागने आपला दोन वर्षापासूनचा विजेतेपदाचा दुष्काळ संपुष्टात आणला. त्यांना २०२४ मध्ये थायलंड स्पर्धेतील विजेतेपदानंतर कायम अंतिम यशाने हुलकावणी दिली होती. तब्बल चार वेळा त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. सिंगापूर स्पर्धेत दुहेरीत विजेतेपद मिळवणारी ही पहिली भारतीय जोडी ठरली.

# प्रतिष्ठेच्या 'चॅम्पियन्स लीग'वर पुन्हा पॅरिस सेंट–जर्मेनचीच मोहोर

## संघर्षपूर्ण अंतिम लढतीत आर्सेनलवर 'पेनल्टी शूटआऊट'मध्ये मात

**■ मुंबई/वृत्तसंस्था**

बुडापेस्ट : पॅरिस सेंट-जर्मेन संघाने युरोपीय क्लब फुटबॉलवरील मक्तेदारी पुन्हा अधोरेखित करताना सलग दुसऱ्यांदा प्रतिष्ठेच्या 'यूएफा चॅम्पियन्स लीग'चे जेतेपद पटकावले. अतिशय संघर्षपूर्ण झालेल्या अंतिम लढतीत फ्रेंच क्लब सेंट-जर्मेनने इंग्लिश क्लब आर्सेनलचा नियमित वेळ आणि अतिरिक्त वेळेतील १-१ अशा बरोबरीनंतर 'पेनल्टी शूटआऊट'मध्ये ४-३ असा पराभव केला. त्यामुळे आर्सेनलचे प्रथमच ही स्पर्धा जिंकण्याचे स्वप्न मात्र अधुरेच राहिले.

काही वर्षांपूर्वीपर्यंत लिओनेल मेसी, नेयमार आणि किलियन एम्बापे यांसारख्या तारांकितांचा भरणा असूनही सेंट-जर्मेनला चॅम्पियन्स लीगचे जेतेपद मिळवता येत नव्हते. मात्र, सेंट-जर्मेनचे व्यवस्थापन आणि प्रशिक्षक लुईस एनरिके यांनी मिळून काही कठीण निर्णय घेताना तारांकित खेळाडूंऐवजी एकजुटीला प्राधान्य दिले. त्यांनी नव्याने संघबांधणी करताना युवा खेळाडूंवर लक्ष केंद्रित केले. याचा फायदा त्यांना सलग दोन हंगामांत मिळाला आहे. एनरिके यांचे कुशल मार्गदर्शन आणि खेळाडूंचा सांघिक खेळ यामुळे सेंट-जर्मेनला चॅम्पियन्स लीगचा करंडक आपल्याकडे राखण्यात यश आले आहे.

"भावना व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. या हंगामाच्या सुरुवातीपासूनच प्रशिक्षक आमच्याशी वारंवार संवाद साधत होते. चॅम्पियन्स लीग जिंकणे अवघड आहेच, पण जेतेपद टिकवणे त्याहूनही अवघड आहे, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे आम्ही अधिक मेहनत घेतली आणि मानसिकदृष्ट्या कणखर राहत पुन्हा यशस्वी झालो," असे सेंट-जर्मेनचा कर्णधार मार्किनियॉस म्हणाला.



हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथे शनिवारी रात्री झालेल्या अंतिम लढतीत आर्सेनलने सुरुवात दमदार केली. पाचव्याच मिनिटाला काय हावेर्ट्झने गोल करत आर्सेनलला आघाडीवर नेले. यानंतर मात्र आर्सेनलने पूर्णपणे बचावात्मक पवित्रा अवलंबला. याचा सेंट-जर्मेनला फायदा झाला. त्यांनी चेंडूवर ताबा राखत आक्रमणाची गती वाढवण्याचा प्रयत्न केला. पूर्वार्धात त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले नाही. परंतु उत्तरार्धात ६५व्या मिनिटाला सेंट-जर्मेनला पेनल्टी किक मिळाली. यावर बॅलन डी'ओर पुरस्कार विजेत्या ओस्मान डेम्बेलेने चेंडू गोलजाळ्यात अचूक मारत सेंट-जर्मेनला १-१ अशी बरोबरी करून दिली. यानंतर नियमित वेळ आणि त्यानंतर ३० मिनिटांचा अतिरिक्त वेळ यात ही बरोबरीची कोंडी कायम राहिली. सेंट-जर्मेनने विजयी गोलसाठी प्रयत्न केले, परंतु आर्सेनलचा बचाव भेदणे त्यांना शक्य झाले नाही, तसेच आर्सेनलचा गोलरक्षक डाव्हिड रायानेही काही फटके अप्रतिमरीत्या अडवले. त्यानंतर झालेल्या 'पेनल्टी शूटआऊट'मध्ये सेंट-जर्मेनकडून पाचपैकी केवळ एक खेळाडू (नुनो मेंडिस) चुकला, तर आर्सेनलच्या एबेरेची एझे आणि गॅब्रिएल मागहाएस या दोघांना गोलजाळीचा वेध घेता आला नाही. त्यामुळे सेंट-जर्मेनने प्रत्येकी पाच पेनल्टीअंती ४-३ अशी बाजी मारली. २ 'युरोपीय चषका'चे १९९२ मध्ये 'युएफा चॅम्पियन्स लीग' असे नामकरण झाल्यापासून केवळ दोन संघांना स्पर्धेचे जेतेपद राखता आले आहे. रेयाल माद्रिदने २०१६, २०१७, २०१८ असे सलग तीन वेळा ही स्पर्धा जिंकली होती. त्यानंतर आता पॅरिस सेंट-जर्मेनला सलग दोनदा जेतेपद मिळवण्यात यश आले आहे.

# जॅकलिनच्या अडचणीत वाढ; मनी लॉंडरिंग प्रकरणात न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश

मनी लॉंडरिंग प्रकरणात जॅकलिन फर्नांडिसच्या अडचणी वाढल्या आहेत. २०० कोटी रुपयांच्या कथित खंडणी संबंधित दिल्लीच्या पटियाला हाऊस न्यायालयाने आरोप निश्चित करण्यासाठी पुरेसे पुरावे उपलब्ध असल्याचा निकाल दिला आहे. पटियाला हाऊस कोर्टाने या प्रकरणात सुकेश चंद्रशेखर, लीना मारिया पॉल, बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस आणि इतर आरोपींवर आरोप निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.

या प्रकरणाशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात आरोप निश्चित करण्यासोबतच, २०० कोटी रुपयांच्या कथित खंडणीशी संबंधित मकोका प्रकरणातही न्यायालयाने सुकेश चंद्रशेखर, लीना मारिया पॉल आणि इतर आरोपींवर आरोप निश्चित केले आहेत. न्यायालयाने सर्व आरोपींना आरोपांवर औपचारिक स्वाक्षरी करण्यासाठी ३ जून रोजी हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

हे प्रकरण तक्रारदार अदिती सिंग यांच्या तक्रारीच्या आधारे दिल्ली पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरमधून उद्भवले आहे. तपास यंत्रणांनुसार, कथित फसवणूक करणारा सुकेश चंद्रशेखर तुरुंगातून कोट्यवधी रुपयांची खंडणी उकळल्याचा आणि त्या पैशांचा विविध मार्गांनी वापर केल्याचा आरोप आहे. अंमलबारी संचालनालयाचा आरोप आहे की, जॅकलिन फर्नांडिसला सुकेश चंद्रशेखरकडून महागड्या भेटवस्तू आणि इतर फायदे मिळाले, तर दुसरीकडे या अभिनेत्रीने सातत्याने हेच सांगितले आहे की, तिला या कथित गुन्हेगारी उत्पन्नाच्या स्रोताबद्दल काहीही माहिती नव्हती.

सुकेश चंद्रशेखर तुरुंगात असला तरी, त्याच्या व्यभिचाराची कहाणी सोशल मीडियावर चर्चेत आहे. जॅकलिनने एकदा या कुख्यात ठगाला भेट दिली होती आणि त्यानंतर त्यांच्या कथित प्रेमकथेचे पदर उलगडू लागले. सुकेशने जॅकलिनला महागड्या भेटवस्तू दिल्या आणि तिच्या परदेशातील कुटुंबीयांना मौल्यवान वस्तू भेट दिल्याचे वृत्त आहे. यातील बहुतेक पैसा बेकायदेशीरपणे कमावलेला होता आणि या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या प्रकरणात जॅकलिनला आता ३ जून रोजी न्यायालयात हजर राहावे लागेल.





## नाहीतर ते सगळं सपशेल फसलं असतं', 'मैं वापस आऊंगा'बद्दल स्पष्टच बोलली शर्वरी वाघ

सात वर्षांपूर्वी आलेल्या ' द फरगॉटन आर्मी ' या सीरिजमधील एका चेहऱ्यानं मनोरंजनसृष्टीचं लक्ष वेधलं, ती होती अभिनेत्री शर्वरी वाघ . पुढे 'बंटी और बबली २' या सिनेमात ती दिसली. नंतर आलेल्या 'मुंज्या' मध्ये तिनं कमालच केली. आता या गोड चेहऱ्याकडे संपूर्ण सिनेसृष्टीचं लक्ष लागलं आहे. आगामी अनेक बिग बजेट सिनेमांमध्ये तिची वर्णी लागली आहे. लवकरच 'मैं वापस आऊंगा' या पीरिऑडीक सिनेमामध्ये ती अनोख्या भूमिकेत दिसणार आहे.सिनेमात प्रेमकथा दाखवण्यात आली आहे, त्यात संवाद कमी आहेत. दोघं नजरेतून आणि हावभावातून संवाद साधतात, हे कसब शिकताना मजा आली. त्या कालखंडातील प्रेम करण्याची आणि ते व्यक्त करण्याची पद्धत जाणून घेताना आधी ती समजून घेणं आवश्यक होतं, नाहीतर ते सगळं सपशेल फसलं असतं, ते विनोदाकडे झुकलं असतं. असं होऊ नये यासाठी प्रयत्न केले. विशेष म्हणजे ते प्रयत्न नैसर्गिकरीत्या होणं अपेक्षित होतं, ते आमच्याकडून करून घेण्याचं काम दिग्दर्शक इम्तियाज अली यांनी केलं आहे.

'मुंजा' सिनेमा सुपरहिट झाल्यानंतर प्रेक्षकांचा आपलेपणा माझ्यापर्यंत पोहोचला. यामुळे आणखी चांगलं काम करण्याची ऊर्जा मिळाली, पण त्याचबरोबर त्यांच्या माझ्याकडून असलेल्या अपेक्षांचाही अंदाज आला. अजून जास्त चांगलं काम करण्यासाठी प्रयत्नशील आहे. अधिक चांगल्या संहिता कशा निवडायच्या, प्रेम करणाऱ्या प्रेक्षकांना भावतील अशा व्यक्तिरेखा कशा साकारायच्या आणि दमदार काम करून प्रेक्षकांचा माझ्यावर असलेला विश्वास कसा वाढवायचा, हे सगळं मला रसिक मायबाप नकळतपणे शिकवत आहेत. अर्थात, त्या अपेक्षांचं मी दडपण घेत नाही. नाहीतर दबावाचा कामावर नकारात्मक परिणाम होतो, हे मी जाणून आहे.मी ऑडिशन्स देत होते तेव्हाही स्पर्धा होती आणि आता माझे सिनेमे गाजल्यानंतरही स्पर्धा आहेच. ही स्पर्धा किंवा टिकून राहण्याची शर्यत नेहमीच -जीवघेणी किंवा नकारात्मक असू शकत नाही. ती स्पर्धा माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. माझ्या फळीतले इतर कलाकार चांगलं काम करतात तेव्हा त्यातूनही प्रेरणा मिळते. त्यामुळे अधिक चांगलं काम करण्याची ऊर्जा मिळते आणि आपसूक माझंही काम प्रभावी होतं. आज अनेक माध्यमातून उत्तम दर्जाचे कलाकार मिळत आहेत, प्रत्येक कलाकार आपल्या कामाचं नाणं खणखणीत वाजवत आहेत. त्याप्रमाणे मीदेखील माझं काम करण्याचा प्रयत्न करत आहे. प्रत्येक भूमिकेतून प्रेक्षकांना नवं काहीतरी देण्याचा मी कसोशीनं प्रयत्न करत असते. आता माझ्या करिअरच्या सुरुवातीला मी प्रयोग करणंच अपेक्षित आहे. त्याशिवाय, सर्वाधिक महत्त्वाचा प्रश्न असतो. बाकी दिग्दर्शक-निर्मात्यांनाही कळलं पाहिजे की, मी विविध प्रकारच्या भूमिका साकारू शकते. म्हणून मी स्वतःला एखाद्या चौकटीत बसवण्याचा अजिबात प्रयत्न करत नाहीय. मी माझ्या लूकमध्ये, सिनेमांमध्ये, भूमिकांमध्ये, गाण्याच्या अल्बममध्ये, भाषेमध्ये विविधता आणण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्यासारखं इतर सगळ्या कलाकारांना मनाजोगतं काम करण्याची संधी मिळो !



## खतरों के खिलाडी परत येण्यास सज्ज; निर्मात्यांकडून प्रोमो शेअर

लोकप्रिय रिॲलिटी शो खतरों के खिलाडी परत येण्यास सज्ज झाला आहे. शूटिंग सुरू करण्यासाठी संपूर्ण टीम सेटवर दाखल झाली आहे. यामुळे खतरों के खिलाडीच्या चाहत्यांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. कलाकार सतत खतरों के खिलाडीच्या सेटवरून नवीन फुटेज शेअर करत आहेत. दरम्यान, खतरों के खिलाडीच्या निर्मात्यांनी चाहत्यांना एक अद्भुत भेट दिली आहे. नुकतेच, खतरों के खिलाडीच्या निर्मात्यांनी एक प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये खतरों के खिलाडीचा होस्ट रोहित शेट्टी धुमाकूळ घालताना दिसत आहे.

प्रोमोमध्ये रोहित शेट्टी कार चालवताना दिसत आहे. याच कारचा वापर करून खतरों के खिलाडी १५ चा होस्ट एका विमानाचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करत आहे. रोहित शेट्टीची स्टाईल पाहून सर्वजण थक्क झाले. लोक म्हणत आहेत की रोहित शेट्टी यावेळी खतरों के खिलाडी १५ मध्ये गोष्टी आणखी बिकट करणार आहे. रोहित शेट्टीने प्रोमोमध्ये याचे संकेतही दिले आहेत. त्याने म्हटले आहे की, यावेळी शोमधील भीतीचे वातावरण दुप्पट होणार आहे. त्यामुळे 'खतरों के खिलाडी १५' च्या कलाकारांना सावध राहावे लागेल.




जर या कलाकारांनी 'खतरों के खिलाडी १५' मध्ये कोणतीही चूक केली, तर रोहित शेट्टी त्यांच्यासाठी परिस्थिती आणखी बिकट करेल. यामुळेच चाहते आता 'खतरों के खिलाडी १५' बद्दल उत्सुक आहेत.

हर्ष गुजराल, शगुन शर्मा, रुबिना दिलैक, गौरव खन्ना आणि फरहाना भट्ट यांसारखे कलाकार 'खतरों के खिलाडी १५' मध्ये दिसणार आहेत. अविनाश मिश्रा, ऊरी, करण वाही, ऋत्विक धनजानी, जस्मिन भसीन, विशाल आदित्य सिंग आणि अविका गोर हे देखील या कलाकारांना कडवी टक्कर देण्यासाठी सज्ज आहेत. रुबिना दिलैक, गौरव खन्ना आणि फरहाना भट्ट सोशल मीडियावर सेटवरून चाहत्यांना सतत अपडेट्स देत असतात.

## मेहनत एकाची लाभ दुसऱ्यालाच ! जब वी मेट सिनेमामुळे बॉबी देओलची खूप मोठी झालेली फसवणूक, इतकी वर्षं मनात सल कायम

गेले काही वर्ष बॉबी देओल सिनेपडद्यावर झपाट्याने काम करताना पाहायला मिळत आहे. त्याच्या प्रत्येक भूमिकांना प्रेक्षकांकडूनही उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळते. येत्या 202627 वर्षातही त्याचे बरेच सिनेमे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत.सध्या बॉबी देओलकडे चित्रपटांची मोठी रांग लागलेली असली, तरी एक काळ असा होता जेव्हा त्याची मार्केट व्हॅल्यू कमी झाल्यामुळे त्याला अनेक प्रोजेक्टमधून वगळण्यात आले होते. जब वी मेट या चित्रपटाच्या बाबतीतही बॉबी देओलसोबत काहीसे असेच घडले होते. इम्तियाज अली दिग्दर्शित या चित्रपटात शाहिद कपूर आणि करिना कपूर ही जोडी दिसली होती. त्याच्या कारकिर्दीतील हा सर्वात महत्त्वाचे वळण घेणारा सिनेमा ठरला. पण बॉबी देओलसाठी मात्र ते एक दुःख होते. अलीकडेच एका मुलाखतीदरम्यान, बॉबी देओलने खुलासा केला की, त्याची




मार्केट व्हॅल्यू कमी असल्यामुळेच त्याला या चित्रपटातून काढून टाकण्यात आले होते.इम्तियाज अली यांच्या 2009 मधील 'जब वी मेट' या चित्रपटात जेव्हा शाहिद कपूरला त्याची जागा दिली, तेव्हा आपल्याला किती मोठा धक्का बसला होता, किंबहुना, आपले मन किती दुखावले गेले होते याची आठवण बॉबी देओलने नुकतीच सांगितली. विशेष म्हणजे, या चित्रपटासाठी दिग्दर्शक आणि मुख्य अभिनेत्री करीना कपूर या दोघांनाही सर्वप्रथम त्यानेच तयार केले होते. एवढे करूनही, 'जब वी मेट'मधून बाहेर पडावे लागल्यामुळे आपल्याला झालेल्या वेदनांबद्दल बॉबी देओलने आता मनमोकळेपणाने भाष्य केले आहे.बॉबी देओल म्हणाला, "तो विषय आता संपला आहे. आम्ही मित्र आहोत. माझे मन दुखावले होते; कारण माझ्या कारकिर्दीच्या त्या टप्प्यावर, मला खरोखरच अशा एका चित्रपटाची नितांत गरज होती. इम्तियाज जेव्हा अभयसोबत 'सोचा ना था' हा चित्रपट बनवत होता, तेव्हापासूनच मी त्याच्यावर खूप विश्वास ठेवला होता. जेव्हा मी त्या चित्रपटाचा 'रफ कट' पाहिला, तेव्हा त्याच्या कामामुळे मी खूप प्रभावित झालो होतो. मी मनातल्या मनात विचार केला, 'तो किती हुशार दिग्दर्शक आहे! मी त्याच्यासोबत नक्कीच काम केले पाहिजे.'"बॉबी देओल पुढे म्हणाला, "ती पहिलीच वेळ होती जेव्हा आम्ही दोघांनी मिळून एक चित्रपट बनवण्याचे ठरवले होते. मात्र, जेव्हा तुमची मार्केट व्हॅल्यू फारशी नसते, तेव्हा तुम्हाला पाठिंबा द्यायला कोणीही तयार नसतं. हा चित्रपट प्रत्यक्षात आणण्यासाठी बराच संघर्ष केला, त्यासाठी खूप मोठा काळ निघून गेला. ज्या प्रॉडक्शन हाऊसकडे मी या चित्रपटाचा प्रस्ताव मांडला होता, त्यांनी दावा केला की इम्तियाज हा दिग्दर्शक म्हणून खूपच महागडा आहे. तरीही, त्याच प्रॉडक्शन हाऊसने पुढे जाऊन इम्तियाजसोबतच तो चित्रपट बनवला. विशेष म्हणजे, त्याच अभिनेत्रीला घेऊन बनवला जिची या प्रोजेक्टमध्ये सहभागी होण्यासाठी मीच मनधरणी केली होती. इनसाइड बॉलिवूड पॉडकास्टला दिलेल्या मुलाखतीत बॉबी देओलने हा खुलासा केला.

सध्या बॉबी देओलचा अनुराग कश्यप दिग्दर्शित 'बंदर' हा चित्रपट रिलीजच्या वाटेवर आहे; हा चित्रपट 5 जून 2026 रोजी प्रदर्शित होणार आहे. याव्यतिरिक्त, बॉबी देओल 'रामायण', 'वेलकम टू द जंगल' आणि 'जना नायकन' या चित्रपटांमध्येही दिसणार आहे.

# तेलबिया व कडधान्य प्रक्रिया उद्योगांना चालना; गोदाम, ऑईल मिल आणि प्रक्रिया युनिटसाठी लाखोंचे अनुदान

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील सोयाबीन, तीळ, तूर, हरभरा, मूग, उडीद यांसारख्या तेलबिया व कडधान्य पिकांचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी करून स्थानिक पातळीवर मूल्यवर्धन वाढविण्यासाठी कृषी विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या ङ्गराष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (-)फआणि ङ्गकडधान्य आत्मनिर्भरता अभियान २०२६-२७फ अंतर्गत प्रक्रिया उद्योग, गोदामे व पॅकेजिंग युनिट उभारणीसाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान उपलब्ध करून देण्यात आले असून पात्र लाभार्थ्यांकडून ऑफलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. योजनेअंतर्गत २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी एकूण प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपये अनुदान दिले जाणार आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ), सहकारी संस्था, सरकारी व खासगी उद्योग तसेच समूह आधारित व्यवसाय संस्था या योजनेसाठी पात्र असून मूल्य साखळी भागीदारांना प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढणी युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९.९० लाख रुपये अनुदान मिळणार आहे. मिनी ऑईल मिलसाठी फिल्टर प्रेससह कमाल ४ लाख रुपये तर फिल्टर प्रेसशिवाय कमाल ३ लाख रुपये अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट्ससाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. युनिटची किमान क्षमता ३०० किलो प्रति तास असणे आवश्यक असून एफएसएसएआय नोंदणी आणि पर्यावरणीय नियमांचे पालन बंधनकारक राहणार आहे. या योजनांमधील अनुदान क्रेडिट-लिंक्ड बॅकएंडेड सबसिडी स्वरूपात असल्याने लाभार्थ्यांना बँक कर्ज घेणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम स्वतःच्या भांडवलातून उभारावी लागणार आहे. प्रकल्प सुरू होण्यापूर्वी व पूर्ण झाल्यानंतर ङ्गकृषी मॅपरफ ॲपद्वारे जिओ-टॅगिंग करणेही अनिवार्य करण्यात आले आहे. इच्छुक शेतकरी, एफपीओ, सहकारी संस्था व उद्योजकांनी आवश्यक कागदपत्रे आणि जीएसटी नोंदणीकृत पुरवठादारांचे अधिकृत दरपत्रक जोडून आपले ऑफलाइन अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावेत. लाभार्थ्यांची निवड ङ्गप्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्यफ या तत्त्वावर करण्यात येणार आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब व्यवहारे यांनी जिल्ह्यातील एफपीओ, सहकारी संस्था आणि पात्र तरुण उद्योजकांनी या संधीचा लाभ घेऊन प्रक्रिया उद्योग उभारावेत, असे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

# प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ साठी अर्ज मागविले; ३१ जुलैपर्यंत ऑनलाइन नोंदणी

जनसंचलन/बुलढाणा

केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत दिला जाणारा प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ यासाठी पात्र मुलांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, क्रीडा, नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य आणि शौर्य या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय व प्रेरणादायी कामगिरी करणाऱ्या मुलांना हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारासाठी अर्जदाराचे वय ५ वर्षांपेक्षा अधिक आणि ३१ जुलै २०२६ रोजी १८ वर्षांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. पात्र मुलांचे प्रस्ताव संबंधित मुले स्वतः किंवा त्यांच्या वतीने राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश प्रशासन, जिल्हाधिकारी, पंचायत राज संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था आदींकडून सादर करता येतील. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन असून इच्छुकांनी ०१ एप्रिल २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल या संकेतस्थळावर अर्ज करावेत. जिल्ह्यातील शिक्षण, क्रीडा, कला, सामाजिक कार्य, संशोधन किंवा शौर्य क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या जास्तीत जास्त मुलांचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. पुरस्कारासंदर्भातील सविस्तर माहिती, पात्रता निकष आणि अर्ज प्रक्रिया संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# शेळीपालन, कुक्कुटपालन व गाय-म्हैस पालन प्रशिक्षणासाठी बुलडाण्यात पाच दिवसीय शिबिर

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) यांच्या वतीने जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा यांच्या सहकार्याने सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी शेळीपालन, कुक्कुटपालन तसेच गाय-म्हैस पालन या विषयांवरील पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. ९ जून ते १३ जून २०२६ या कालावधीत बुलडाणा येथे होणार आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना तंत्रशुद्ध मार्गदर्शन देऊन त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. प्रशिक्षणामध्ये शेळीपालन, कुक्कुटपालन आणि गाय-म्हैस पालनाच्या विविध पद्धती, पशुधनाच्या जाती, लसीकरण, रोग व त्यांची लक्षणे, खाद्य व्यवस्थापन, चारा निर्मिती तसेच व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक असलेल्या बाबींची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. याशिवाय उद्योजकता विकास, उद्योग संधी, शासकीय योजनांची माहिती, आर्थिक सहाय्य व उद्योग उभारणीसाठी आवश्यक मार्गदर्शन तज्ज्ञ व्यक्तींकडून करण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी उमेदवार किमान ५ वी उत्तीर्ण व वय वर्षे १८ पूर्ण असणे आवश्यक आहे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या सहभागी उमेदवारांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी नोंदणी, शुल्क व अधिक माहितीसाठी इच्छुकांनी दि. ९ जून २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत श्री. गणेश गुप्ता, प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी), जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालयाजवळ, चिखली रोड, बुलडाणा येथे संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी ९०११५७८८५४ किंवा ८२७५०९३२०१ या क्रमांकावर संपर्क साधता येईल. अधिकाधिक युवक-युवतींनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय अधिकारी श्री. किशोर अंभोरे यांनी केले आहे.

# प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ साठी अर्ज मागविले; 31 जुलैपर्यंत ऑनलाइन नोंदणी

जनसंचलन/बुलढाणा

केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत दिला जाणारा प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ यासाठी पात्र मुलांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, क्रीडा, नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य आणि शौर्य या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय व प्रेरणादायी कामगिरी करणाऱ्या मुलांना हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारासाठी अर्जदाराचे वय ५ वर्षांपेक्षा अधिक आणि ३१ जुलै २०२६ रोजी १८ वर्षांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. पात्र मुलांचे प्रस्ताव संबंधित मुले स्वतः किंवा त्यांच्या वतीने राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश प्रशासन, जिल्हाधिकारी, पंचायत राज संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था आदींकडून सादर करता येतील. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन असून इच्छुकांनी ०१ एप्रिल २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल या संकेतस्थळावर अर्ज करावेत. जिल्ह्यातील शिक्षण, क्रीडा, कला, सामाजिक कार्य, संशोधन किंवा शौर्य क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या जास्तीत जास्त मुलांचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. पुरस्कारासंदर्भातील सविस्तर माहिती, पात्रता निकष आणि अर्ज प्रक्रिया संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# बुलढाणा जिल्हा आयुष्मान कार्ड ई-केवायसीमध्ये राज्यात अव्वल

जनसंचलन/बुलढाणा

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आयुष्मान कार्ड ई-केवायसी मोहिमेत बुलढाणा जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत मागील सात दिवसांत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. जिल्ह्यातील लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी आरोग्य विभाग, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत यंत्रणा तसेच संबंधित विभागांच्या समन्वयातून विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमुळे मोठ्या प्रमाणावर लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण झाली असून जिल्ह्याने राज्यस्तरावर अव्वल स्थान मिळविले आहे. जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या प्रभावी नियोजनामुळे तसेच क्षेत्रीय स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या परिश्रमांमुळे ही यशस्वी कामगिरी साध्य झाली आहे. पात्र लाभार्थ्यांनी अद्याप ई-केवायसी केलेली नसल्यास ती तातडीने पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. जिल्ह्याच्या या यशाबद्दल जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# स्मशानभूमी तयारही झाली नाही अन् आधीच काळ्या भुतांचा डाव!

## म्हसला बु. स्मशानभूमीतून ७ क्विंटल लोखंडी आसारी गायब

**जनसंचलन/धाड**

तालुक्यातील म्हसला बु. येथे एक धक्कादायक आणि तितकीच भयावह घटना समोर आली आहे. जिथे मृतांना शेवटचा निरोप दिला जाणार आहे, ती स्मशानभूमी अद्याप पूर्णपणे तयारही झाली नाही; तोच अज्ञात चोरट्यांनी थेट स्मशानभूमीच्या बांधकाम साहित्यावरच डल्ला मारला आहे. स्मशानभूमीच्या कंपाउंड बांधकामासाठी आणलेली तब्बल ७ क्विंटल लोखंडी आसारी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली असून, तिची किंमत अंदाजे ३५ हजार रुपये असल्याची माहिती आहे. फिर्यादी सचीन रमेश तायडे वय ३० वर्षे, रा. म्हसला खुर्द, हे कोलवड येथील ठेकेदार आकाश चाकोते यांच्याकडे सुपरवायझर म्हणून काम पाहतात. चाकोते यांनी म्हसला बु. येथील स्मशानभूमीच्या कंपाउंड बांधकामाचा ठेका घेतला आहे. या बांधकामासाठी पुणे येथून लोखंडी आसारी मागवून स्मशानभूमीच्या कंपाउंडमधील मोकळ्या जागेत ठेवण्यात आली होती. दि. ३० मे २०२६ रोजी रात्री ९ वाजेपर्यंत सदर लोखंडी आसारी जागेवरच होती. मात्र दि. ३१ मे रोजी सकाळी १० वाजता सुपरवायझर सचीन तायडे कामावर गेले असता त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली. स्मशानभूमीच्या परिसरात ठेवलेली लोखंडी आसारी गायब असल्याचे त्यांच्या निर्दशनास आले. क्षणात परिसरात खळबळ उडाली. स्मशान भूमीसारख्या ठिकाणावरूनच चोरी झाल्याने गावात संताप आणि आश्चर्य व्यक्त केले जात आहे. झुडुजिवंतांचे तर सोडा, आता चोरट्यांनी स्मशानभूमीलाही सोडले नाही,फक्त अशी चर्चा परिसरात रंगू लागली आहे. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत. आता या झकाळ्या भुतांचाप माग काढण्यात पोलिसांना यश येते का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# आदर्श आचारसंहितेमुळे जून महिन्यात विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिन रद्द

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय लोकशाही दिन तसेच महिला विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. मात्र, महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या वार्षिक निवडणूक-२०२६ साठी आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे जून महिन्यात हे दोन्ही कार्यक्रम आयोजित करण्यात येणार नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या दिनांक २६ सप्टेंबर २०१२ च्या परिपत्रकानुसार विभागीय लोकशाही दिन आणि महिला लोकशाही दिन नियमितपणे आयोजित केले जातात. दरम्यान, भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकांसाठी १८ मे २०२६ पासून आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार ज्या क्षेत्रांमध्ये निवडणुकीची आचारसंहिता लागू असते, त्या ठिकाणी संबंधित स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करता येत नाही. त्यामुळे जून २०२६ महिन्यात विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रशासनाने याबाबत जनसामान्य नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन केले आहे.

# पाणीटंचाई निवारणासाठी मोताळा तालुक्यातील १५ गावांमध्ये २० विंधण विहिरींना मंजुरी

**जनसंचलन/बुलढाणा**



सन २०२५-२६ मधील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन मोताळा तालुक्यातील १५ गावांमध्ये २० विंधण विहिरी (कुपनलिका) खोदण्याच्या कामांना जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मंजुरी दिली आहे. जिल्हा परिषद बुलढाणाच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने सादर केलेल्या प्रस्तावांना तसेच तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि भूवैज्ञानिकांच्या शिफारशींना मान्यता देत हा निर्णय घेण्यात आला आहे. मंजूर गावांमध्ये गुगळी, सिंदखेड, तळणी, पोखरी, पिंपळगावदेवी, तपोवन, पुन्हई, लपाली, खरबडी, गिरोली, इसलवाडी, शेलापूर खुर्द, पिंपळगावनाथ, चिचखेडनाथ आणि काळेगाव यांचा समावेश आहे. या गावांमध्ये लोकसंख्या व पाणीटंचाईची तीव्रता विचारात घेऊन एकूण २० विंधण विहिरींना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये लपाली येथे ३, सिंदखेड, पिंपळगावदेवी आणि तपोवन येथे प्रत्येकी २ तर उर्वरित गावांमध्ये प्रत्येकी १ विंधण विहीर मंजूर करण्यात आली आहे. शासनाच्या ३ फेब्रुवारी १९९९ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही कामे तातडीने पूर्ण करण्याची जबाबदारी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांवर सोपविण्यात आली आहे. विंधण विहिरींची कामे पूर्ण झाल्यानंतर संबंधित गावांना पुरेसे पाणी उपलब्ध होत असल्यास टँकरद्वारे किंवा खाजगी विहिरी अधिग्रहणाद्वारे होणारा पाणीपुरवठा बंद करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. कामे सुरू करण्यापूर्वी व पूर्ण झाल्यानंतर पंचनामा करणे, भू-टॅगिंगद्वारे छायाचित्रे नोंदविणे, खाजगी जागेवर काम असल्यास नियमानुसार दानपत्र घेणे तसेच गुणवत्तेची खात्री झाल्यानंतरच देयके अदा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय नादुरुस्त हातपंपांची दुरुस्ती करूनही गरज असल्यासच नवीन विंधण विहिरी खोदण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मंजूर सर्व कामे ३० जून २०२६ पूर्वी पूर्ण करणे आवश्यक असून, मुदतीत पूर्ण न झालेल्या उपाययोजनांची मंजुरी शासनाने मुदतवाढ न दिल्यास आपोआप रद्द होणार आहे. या उपाययोजनांमुळे मोताळा तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आयुष्मान भारत व वय वंदना कार्ड ई-केवायसी मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**जनसंचलन/बुलढाणा**

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (-) अंतर्गत आयुष्मान भारत कार्ड तसेच ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या आयुष्मान वय वंदना कार्ड ई-केवायसी मोहिमेला जिल्ह्यात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मागील सात दिवसांत आयुष्मान भारत योजनेअंतर्गत १७ हजार १२० लाभार्थ्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यात आली असून, आयुष्मान वय वंदना कार्डसाठी १ हजार २९३ ज्येष्ठ नागरिकांची ई-केवायसी प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचारांची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी स्वत:चे तसेच कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांचे आयुष्मान भारत कार्ड आणि वय वंदना कार्ड तातडीने तयार करून घ्यावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. आयुष्मान कार्ड किंवा वय वंदना कार्ड काढण्यासाठी नागरिकांनी आपल्या नजीकच्या ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, आयुष्मान आरोग्य मंदिर तसेच आपले सरकार सेवा केंद्र () येथे संपर्क साधावा. आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत असून विविध विभागांच्या समन्वयातून पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा लाभ पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांनी या संधीचा लाभ घेत आपल्या कुटुंबाचे आयुष्मान भारत व वय वंदना कार्ड त्वरित तयार करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८